## निशाणी क्र. ५ खाली आदेश

सदरचा अर्ज वादींनी प्रतिवादी विरूध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे केला आहे.

**२.** मौजे कामार्ली ता.पेण, जि.रायगड यांचे हद्दीतील मिळकत क्र. (१) मौजे पानेड येथील सर्व्हे नं.७०, क्षेत्र १.२२.४० हेक्टर आर, आकार १६.५३ रूपये पैसे, मिळकत क्र.(२) मौजे कामार्ली येथील सर्व्हे नं.४८, क्षेत्र ०.३७.४० हेक्टर आर, आकार ०८.७० रूपये पैसे आणि मिळकत क्र. (३) सर्व्हे नं.६, क्षेत्र ०.०६.०० हेक्टर आर, आकार ०.१० रूपये पैसे या तिन्ही मिळकती या दाव्याचा विषय आहेत. यापुढे सोयीकरीता त्यांना 'दावा मिळकती' म्हणून संबोधण्यात येत आहे.

**३.** वादी यांचे थोडक्यात कथन असे आहे की, दावा मिळकती या त्यांच्या वडीलोपार्जित मिळकती असून आजोबा बंडू बाबू मानकवळे यांच्या मृत्यूपश्चात वादी व प्रतिवादींचे वडील कै.नारायण आणि काका हरीश्चंद्र यांच्यामध्ये मिळकतींचे वाटप झाले. सदरच्या वाटपाद्वारे दावा मिळकती व अन्य दोन मिळकती वादी—प्रतिवादींचे वडील कै. नारायण यांच्या हिश्यास आल्या. सदर मिळकतींचे आजपर्यंत वाटप झालेले नाहीत.

**४.** वादींचे पुढे कथन की, दावा मिळकत क्र.१ मौजे पानेड येथील सर्व्हे नं.७० या मिळकती पैकी ०.११.० गुंठे क्षेत्र भारत सरकाने दहेज गाव ते नागोठणेपर्यंतच्या रिलायन्स गॅस पाईपलाईनकरीता संपादित केले. त्यावेळेस मोबदल्याची रक्कम वादी—प्रतिवादींकरीता एकत्रितपणे देण्यात आली होती. असे असताना देखील दावा मिळकतींचे वाटप झाले नसताना सुध्दा प्रतिवादीने प्रत्येकास रक्कम रूपये ८०,०००/— प्रमाणे एकूण रक्कम रूपये ८,८०,०००/— इतकाच मोबदला आल्याचे सांगून स्वतःच्या बॅंक खात्यातून वादी क्र.१ हीस रक्कम रूपये ९०,०००/—, वादी क्र.२ आणि ३ यांना प्रत्येकी २,००,०००/—, वादी क्र.४ आणि ५ यांना प्रत्येकी १,००,०००/— इतकी रक्कम दिली. तर स्वतः करीता रक्कत रूपये २,००,०००/— ठेवून घेतली. सदर बाबत वादी क्र.२ यांनी माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, संपादनाचा मोबदला म्हणून प्रत्य क्षात रक्कम रूपये २७,५०,०००/— रूपये इतकी रक्कम प्रतिवादीस बॅंक खात्याद्वारे मिळाली असल्याचे कळाले. त्यानंतर वादींनी दावा मिळकतींचे उतारे पाहिले असता, दावा

मिळकत क्र.२ म्हणजेच मौजे कामार्ली गट क्र.४८ ही जमीन प्रतिवादीने त्याचे वडील कै. नारायण मानकवळे यांच्या नावाचा वापर करून दि.०१.०७.२००८ रोजीचे नोंदणी क्र. ३८४२/२००८ हे खोटे व्यवस्थापत्र नोंदवल्याचे दिसून आले. त्यास अनुसरून सदरची दावा मिळकत क्र.२ च्या मालकी सदरी प्रतिवादीचे नाव लावण्यात आल्याचे देखील दिसून आले. सदर बाब उघड झालेनंतर वादीने प्रतिवादीस विचारणा केली असता, प्रतिवादीने काहीही दुजोरा दिला नाही. त्यामुळे वादींनी दि.२९.०९.२०२१ रोजी वकिलांमार्फत नोटीस पाठविली असता, प्रतिवादीने दि.१८.१०.२०२१ रोजी वकिलांमार्फत उत्तरी नोटीस पाठवून वादींच्या कथनांना आव्हानीत केले. त्यामुळे सदर अर्जामार्फत वादींनी प्रतिवादीने दाव्याचा निकाल होईपर्यंत दावा मिळकती स्वत: अथवा त्यांच्या मार्फत इतर कोणाकरवी विक्री अथवा हस्तांतरीत करू नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी केली आहे.

५. प्रतिवादी यांनी **नि.१८** खाली त्यांचे म्हणणे देवून वादींच्या सर्व कथनांचा साफ इन्कार केला आहे. प्रतिवादीचे कथन की, दावा मिळकत क्र.१ मौजे पानेड सर्व्हे नं. ७० या मिळकतीपैकी काही क्षेत्र भुसंपादनात गेलेबाबत सरकारमार्फत देण्यात आलेल्या नुकसान भरपाईची रक्कम त्याचे वडील कै.नारायण मानकवळे यांनी दत्तात्रेय मानकवळे म्हणजेच वादी क्र.२ यास रोख स्वरूपात दिली होती. त्यावेळेसच दावा मिळकत क्र.२ म्हणजेच मौजे कामार्ली गट नं.४८ ही मिळकत प्रतिवादीस देत असल्याचे देखील कै. नारायण यांनी त्याच्या सर्व वारसांसमक्ष म्हणजेच वादी आणि प्रतिवादी यांच्यासमक्ष स्पष्ट केले होते. याची पुर्ण जाणीव आणि माहिती वादी यांना असून सदर मिळकतीसंदर्भात व्यवस्थापत्रास अनुसरून करण्यात आलेल्या नोंदीकरीता वादींनी स्वत: वर्दी आणि जबाब दिलेला आहे. त्यास अनुसरूनच कामार्ली गट नं.४८ यास प्रतिवादी याचे नाव लागले आहे. प्रतिवादीचे पुढे कथन की, संपादनाच्या मोबदल्यात रिलायन्स गॅस पाईपलाईन यांच्यातर्फे ८,९१,२०२/— रूपये इतकीच रक्कम प्राप्त झाली असून रक्कम रू. २७,५०,०००/— प्राप्त झाली नसल्याने त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा वादींकडे उपलब्ध नाही. सोबतच सदर रकमेसंदर्भात वादींनी दि.०६.१२.२०२० रोजी पेण पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दाखल केला असता, वादी क्र.२ दत्तात्रेय मानकवळे याने स्वत: तो अर्ज निकाली काढणेबाबत लेखी जबाब दिल्याने सदर तक्रार देखील निकाली काढण्यात आली. याउलट वादी रक्कम रूपये १६,०१,६६७/— या रकमेची फसवणूक झाल्याचे कथन करत असल्यास या कोर्टास ज्युरीसडीक्शन नसलेबाबतचा आणि स्टॅप डयुटीचा मुद्दा काढून दावा फेटाळण्यात यावा अशी प्रतिवादीने मागणी केली आहे.

**६.** माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण आहे काय? | ... नकारार्थी |
| २. | न्यायाचा तराजू वादी यांच्या हक्कात आहे काय ? | ... नकारार्थी |
| ३. | अर्ज नामंजुर झाला तर वादी यांचे न भरून येणारे नुकसान होईल काय ? | ... नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**७.** वादी यांच्यातर्फे विद्वान विधीज्ञ श्रीमती वर्षा म्हात्रे व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एस.एच.देशमुख यांनी त्यांचा अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तिवाद केला. सबब सदर युक्तिवाद येथे पुन्हा नमुद केलेला नाही.

**मुददा क्र. १ बाबत**ः—

**८.** अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी त्यांच्या अर्जाच्या पृष्ट्यर्थ अभिलेखावर **नि.०४** खाली मौजे पानेड येथील गट नं.७० चा ७/१२ उतारा, मौजे कामार्ली येथील गट नं.४८ चा ७/१२ उतारा, मौजे कामार्ली येथील गट नं.६ चा ७/१२ उतारा, मौजे कामार्ली येथील फेरफार नं.३१२ चा उतारा, दि.२९.०९.२०२१ रोजी वादी यांनी वकिलांमार्फत पाठविलेल्या नोटीसीची स्थळ प्रत, प्रतिवादी यांनी वकिलांमार्फत पाठविलेली उत्तरी नोटीस आणि तहसिलदार, पेण यांचे कार्यालयातील फेरफार नं.३१२ बाबतचे अर्ज, प्रतिज्ञापत्र आणि वर्दी जबाब यांची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. याउलट प्रतिवादीने कोणत्याही कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवलेली नाही.

**९.** वर नमुद कागदपत्रातील वादीने दाखल केलेल्या **नि.०४** अनु.१ वरील गट नं. ७० मौजे पानेड या दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी वादी आणि प्रतिवादींच्या नावे सामाईक क्षेत्रात नमुद असल्याचे तर विठाबाई हरीभाउ पाटील या नावे देखील मालक सदरी काही क्षेत्र असल्याचे दिसून येत आहे. अनु.२ म्हणजेच गट नं.४८ मौजे कामार्ली या मिळकतीच्या ७/१२ सदरी प्रतिवादी शंकर मानकवळे याचे नाव असल्याचे, गट नं.०६ मौजे कामार्ली या मिळकतीच्या ७/१२ सदरी हरीश्चंद्र बंडू मानकवळे, नारायण बंडू

मानकवळे आणि विठाबाई हरीभाउ पाटील या तिघांच्या नावे सामाईक क्षेत्र असल्याचे दिसून येत आहे. त्यापुढे अनु.४ वरील फेरफार क्र.३१२ वरून दि.०१.०७.२००८ रोजीच्या नोंदणीकृत व्यवस्थापत्रास अनुसरून प्रतिवादी शंकर नारायण मानकवळे याचे नाव मौजे कामार्ली गट नं.४८ च्या सदरी लागल्याचे व त्याकरीता इतर वारसांनी कबुली जबाब दिल्याचे नमुद करण्यात आल्याचे दिसते. अनु.५ वर वादींनी त्यांच्या वकिलांमार्फत प्रतिवादीस दि.२९.०९.२०२१ रोजी पाठविलेल्या नोटीसीच्या प्रतीवरून वादींनी प्रतिवादीकडे दावा मिळकतींमधील त्यांचा निर्तुटक हिस्सा मागितल्याचे दिसून येते. तर प्रतिवादीने त्याच्या वकिलांमार्फत दि.१८.१०.२०२१ रोजी पाठविलेल्या उत्तरी नोटीसवरून प्रतिवादीने वादींची कथने पुर्णपणे नाकारल्याचे दिसून येते. त्यापुढे अनु.७ वरील फेरफार क्र.३१२ बाबतचे अर्ज, प्रतिज्ञापत्र आणि वर्दी जबाब यांच्या प्रमाणित प्रतीचें अवलोकन केले असता, दि.०१. ०७.२००८ रोजीच्या व्यवस्थापत्रास अनुसरून कै.नारायण मानकवळे यांनी दावा मिळकत क्र.२ म्हणजेच मौजे कामार्ली गट नं.४८ क्षेत्र ०—३७—०४ ही मिळकत प्रतिवादी शंकर नारायण मानकवळे यास दिल्याचे दिसून येते. त्या पुढे व्यवस्थापत्रास अनुसरून घेण्यात आलेल्या वर्दी जबाबामध्ये सर्व वादींनी प्रतिवादीच्या नावे सदर मिळकत होणेकरीता कोणताही आक्षेप नसल्याचे लिहून दिल्याचे दिसून येते.

**१०.** दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

**११.** तिन्ही दावा मिळकती या वडीलोपार्जित मिळकती असल्याचे वादींचे कथन आहे. सदर बाब प्रतिवादीने कोठेही नाकारलेली नाही. त्या पुढे दावा मिळकत क्र.१ म्हणजेच गट नं.७० मौजे पानेड येथील दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी वादी—प्रतिवादींचे नाव ७/१२ सदरी सामाईक क्षेत्रात असल्याने त्यावरून प्रतिवादीचा नेमका किती हिस्सा हे वाटपाअभावी सांगता येणार नसल्याचे स्पष्टच आहे.

**१२.** दावा मिळकत क्र.२ म्हणजेच गट नं.४८ मौजे कामार्ली या मिळकतीच्या ७/१२ सदरी मालक म्हणून प्रतिवादी शंकर मानकवळे याचे नाव फेरफार नोंद क्र.३१२ अन्वये आल्याचे दिसून येते. तर वादींनीच दाखल केलेल्या व्यवस्थापत्राबद्दलच्या वर्दी जबाबावरून सर्व वादींनी दावा मिळकत क्र.२ यास प्रतिवादीचे नाव लागण्यास काहीही हरकत नसल्याचे लिहून दिल्याचे आणि सहया केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. येथे वादींनी कै.नारायण मानकवळे यांचे कायदेशीर वारस म्हणूनच वर्दी जबाब दिल्याचे

सकृतदर्शनी दिसून येत आहे.

**१३.** दावा मिळकत क्र.३ म्हणजेच गट क्र.६ मौजे कामार्ली या मिळकतीच्या ७/१२ सदरी हरिश्चंद्र बंडू मानकवळे, नारायण बंडू मानकवळे आणि विठाबाई हरीभाउ पाटील यांच्या नावे ०.०६०० इतके क्षेत्र सामाईक क्षेत्र म्हणून नमूद असल्याचे दिसते. त्यावरून कै.नारायण बंडू मानकवळे यांचा स्वतंत्र हिस्सा पडल्याचे दिसून येत नाही.

**१४.** वर नमुद प्रमाणे तिन्ही दावा मिळकतींचे वादींनीच दाखल केलेल्या ७/१२ उता—यांवरून त्यांच्या मालकी—ताबेसंबंधीची सकृतदर्शनी माहिती मिळत आहे. दावा मिळकत क्र.१ मौजे पानेड गट नं.७० मध्ये वादी—प्रतिवादींचे वाटप झाले नसल्याने प्रतिवादी ती मिळकत वादींच्या परवानगीशिवाय विकू शकेल हे कथन मान्य करण्याजोगे नाही. अविभाजीत हिस्सा विक्री करण्याकरीता कोणत्याही वारसास इतर वारसाच्या संमत्तीची गरज भासते. परंतु येथे त्याबाबत काहीही दिसून येत नाही. त्या पुढे प्रतिवादी अशा प्रकारची विक्री अथवा हस्तांतर करत आहे अथवा करण्याचा प्रयत्न करत आहे असे वादींचे कथन देखील नाही. तसेच याच मिळकतीपैकी भुसंपादित झालेल्या जमीनीच्या मोबदल्याच्या रकमेकरीता असलेल्या आक्षेपाबद्दल वादींनी या दाव्यात कोणतीही मागणी केलेली नाही. तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा आदेश करणेकरीता एखादा पक्ष एखादे अनपेक्षीत कृत्य करत असल्याचे अथवा करण्याच्या प्रयत्नात असल्याचे वादींचे कथन आणि त्यास सहाय्य करणारी कागदपत्रे अभिलेखावर असणे आवश्यक आहे. येथे वादींची त्या स्वरूपाची कथने आणि कागदोपत्री पुरावे दोन्हीही अनुपस्थीत असल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी विरूध्द दावा मिळकत क्र.१ बाबत पोकळ स्वरूपाचा मनाई हुकुम करणे न्यायोचित ठरणार नाही.

**१५.** दावा मिळकत क्र.२ गट नं.४८ मौजे कामार्ली या मिळकतीचा विचार केल्यास वादींनी स्वत:च अभिलेखावर दाखल केलेल्या व्यवस्थापत्र आणि वर्दी जबाबाच्या प्रमाणित प्रतीवरून सदर मिळकतीस प्रतिवादीचे नाव लागण्यास काहीही हरकत नसल्याचे वादींनी स्वत: लिहून दिल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यास अनुसरूनच फेरफार क्र. ३१२ अन्वये प्रतिवादीचे नाव दावा मिळकत क्र.२ ला लागल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीत वादींचे हक्क डावलून प्रतिवादीने स्वत:चे नाव दावा मिळकत क्र.२ यास लावल्याच्या कथनास पुष्टी मिळत नाही. वादींनी देखील फेरफार नोंद क्र.३१२ हा आव्हानीत केला किंवा कसे याबाबतचे कथन दाव्यात मांडलेले नाही. अशा परिस्थितीत

प्रतिवादी विरूध्द दावा मिळकत क्र.२ बद्दल मनाई हुकुमाचा अर्ज करणे न्यायोचित होणार नाही.

**१६.** त्यापुढे दावा मिळकत क्र.३ म्हणजेच गट क्र.६ मौजे कामार्ली या दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी हरिश्चंद्र बंडू मानकवळे, नारायण बंडू मानकवळे आणि विठाबाई हरीभाउ पाटील यांच्या नावे सामाईक क्षेत्र असल्याने त्यांच्यामध्ये देखील वाटप झाले नसल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत कै.नारायण बंडू मानकवळे यांच्या वारसांनी अविभाजीत हिश्याची विक्री करण्याचा प्रयत्न केला या कथनास पुष्टी मिळत नाही. येथे प्रतिवादी दावा मिळकत विक्री करत असल्याचे अथवा करण्याचा प्रयत्न करत असल्याचे वादींचे कथन देखील नाही. त्यास दुजोरा देणारे कागदपत्र देखील अभिलेखावर नाहीत. त्यामुळेच प्रतिवादीविरूध्द दावा मिळकतीसंदर्भात तुर्तातुर्त मानई आदेश करण्याकरीता कोणतेही सबळ कारण दिसून येत नाही.

**१७.** एकंदरीत चर्चेनंतर तथ्ये आणि अभिलेखावरील उपस्थित कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सकृतदर्शनी केस वादींच्या लाभात असल्याचे दिसून येत नाही. तात्पुरत्या स्वरूपाच्या मनाईची मागणी करण्याकरीता वादींनी त्यांच्या कथनांना बळ देणारे कागदोपत्री पुरावे अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे. परंतु यामितीस सदरचे पुरावे अभिलेखावर उपलब्ध नाहीत. परिणामी वादींच्या लाभात सकृतदर्शनी केस असल्याचे दिसून येत नाही. करीता मुद्दा क्र.१ नकारार्थी नोंदवण्यात येतो.

**<u>मुद्दा क्र.२ आणि ३ बाबत</u>:—**

**१८.** वर नमुदप्रमाणे वादी त्यांच्या लाभात सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत करू शकले नाहीत. सोबतच वादी करत असलेली मागणी मंजुर करण्याकरीता प्रतिवादी तिन्ही दावा मिळकतींची विक्री अथवा हस्तांतर करण्याचा प्रयत्न आहेत अथवा करू शकतील या कथनाबाबत शंका निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही प्रकारची मनाई करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळेच वादींच्या मागणीप्रमाणे पोकळया स्वरूपाचा मनाई हुकुम प्रतिवादी विरूध्द केल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याउलट मनाई हुकुम न दिल्यास या मितीस वादींचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे असे म्हणण्यास वाव नाही. परिणामी न्यायाचा तराजू प्रतिवादीच्या बाजूने झुकत आहे. करीता मुद्दा क्र.२ आणि ३ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुददा क्र. ४ बाबत</u>:—**

**१९.** तात्पुरता मनाई हुकूम मिळवण्यासाठी वादीस सकृतदर्शनी प्रकरण, न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने व अर्ज मंजूर न केल्यास होणारे अपरीमीत नुकसान सिद्ध करणे गरजेचे आहे. वादीस वरील तिन्ही मुद्दे एकत्रितपणे प्रकरणात असल्याबाबत प्रथमदर्शनी पुरावा देणे गरजेचे आहे. वरील तिन्ही मुद्दे वादीने तिन्ही दावा मिळकतीसंदर्भात प्रथमदर्शनी सिद्ध केले नाहीत. मुद्दे क्र. १ ते ३ चा सांगोपांग विचार करता मुद्दे क्र. १ ते ३ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने वादी हे वाद मिळकती बाबत तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यास पात्र नाहीत. सबब मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :—

**<u>आदेश</u>**

१. वादींचा निशाणी क्र. ५ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च अंतिम आदेशावेळी विचारात घेण्यात येईल.

पेण.
दि. २३.०१.२०२३

**( श्रीमती आर. एन. मुजावर )**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेण**

***CERTIFICATE***

*“I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order”.*

*Name of the stenographer : Shri. A. A. Nakhawa*<br>
*Name of the Court : Smt. R. N. Mujawar*<br>
*Civil Judge, J.D.and J.M.F.C. Pen Date of*<br>
*Decision : 23-01-2023*<br>
*Order signed by presiding officer : 27-01-2023*<br>
*Date of PDF : 27-01-2023*<br>
*Order uploaded on : 27-01-2023*